# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा

सातारा तालुका पोलीस ठाणे
संपर्क- 02162-238607
ईमेल- sataratps.satara@mahapolice.gov.in


दिनांक :- 08/04/2026

## प्रेसनोट

### -: ड्रग्ज विकणाऱ्यावर सातारा तालुका पोलीसांचा सर्जिकल स्ट्राईक :-

**(सातारा तालुका डीबी पथकाची धडाकेबाज कामगिरी)**

सातारा तालुका पोलीस ठाणे कडील पोहवा राजु शिखरे यांना गोपनिय माहिती मिळाली होती की शेंद्रे ता.जि.सातारा गावच्या हददीत बेकायदेशीर रित्या एका चारचाकी वाहनातुन ड्रग्ज विक्री करण्यास दोन इसम येणार आहेत. त्यानुसार पथक तयार करुन रेड कारवाई करणेत आली आहे.

सदर माहितीच्या अनुषंगाने मा.पोलीस अधीक्षक सो, सातारा, तुषार दोशी, मा.अपर पोलीस अधीक्षक सो, सातारा, श्रीमती वैशाली कडुकर, मा.उपविभागीय अधिकारी सातारा विभाग, सातारा श्री राजीव नवले यांचे मार्गदर्शनाखाली **सातारा तालुका पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी श्री निलेश तांबे** यांनी तहसिलदार यादव साहेब, फॉरेन्सिक टिम, शासकीय पंच तसेच वजनकाटा मापकधारक यांच्यासह सातारा तालुका पोलीस ठाणे कडील विशेष पथक तयार करुन **पोलीस निरीक्षक, निलेश तांबे** यांनी सदर गोपनिय माहितीनुसार डीबी पथकास सदर माहितीच्या पडताळणी करुन कारवाई करण्यास कळविले होते त्यानुसार डीबी पथकाने दिनांक 07/04/2026 रोजी रात्री 21.00 वा चे सुमारास सातारा तालुका पोलीस ठाणेचे शेंद्रे गावचे हददीमध्ये शेंद्रे ते बोगदा जाणारे रोडला टोयाटो इटिओस कार क्रमांक एमएच 47 के 1619 ही थांबवुन गाडीतील इसमांकडे चौकशी केली असता गाडीतील इसमांने विचारलेल्या प्रश्नांची उडवाउडवीची उत्तरे दिल्याने तसेच सदर गाडीची तपासणी करणेस आडकाठी केल्याने गोपनिय माहितीची खात्री झाल्याने सदर गाडीची दोन पंचासमक्ष तपासणी करुन 4 लाख 80 हजार रु.किंमतीची ब्राऊनिश हेरॉईन ड्रग्ज, 20 हजार रुपये किंमतीचे दोन मोबाईल व अंदाजे 4 लाख रु किंमतीचे चारचाकी वाहन असा एकुण 9 लाख रुपये चा मुददेमाल हस्तगत करणेत आला आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक अभिजीत गुरव हे करित आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक सो, सातारा, तुषार दोशी, मा.अपर पोलीस अधीक्षक सो, सातारा, श्रीमती वैशाली कडुकर, मा.उपविभागीय अधिकारी सातारा विभाग, सातारा श्री राजीव नवले, सातारा तालुका पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी श्री निलेश तांबे यांचे मार्गदर्शनाखाली **गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनि अभिजीत गुरव, सपोनि अन्वर मुजावर, सपोनि सुदर्शन काटकर, पोहवा मनोज गायकवाड, पोहवा राजु शिखरे, पोहवा दादा स्वामी, पोहवा सतिश बाबर, पोहवा प्रदीप मोहिते, पोहवा मालोजी चव्हाण, पोहवा किरण जगताप, पोहवा संदिप आवळे, पोकॉ संदिप पांडव, पोकॉ सुनिल भोसले, पोकॉ उमेश बगाडे तसेच फॉरेन्सिक पथकातील सपोनि रुपाली मोरे व पथक** यांनी केलेली आहे.

सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे **श्री.तुषार दोशी, पोलीस अधीक्षक सातारा, श्रीमती वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक सातारा, श्री राजीव नवले, मा.उपविभागीय अधिकारी सातारा विभाग, सातारा** यांनी कौतुक व अभिनंदन केले आहे.

**पोलीस अधीक्षक सातारा यांच्या मान्यतेने**

**प्रति,**

**सर्व वृत्तपत्र संपादक, सातारा जिल्हा**
**सर्व मिडीया प्रतिनिधी सातारा**